ePaper
अखेर आमदार सुरेश धस यांनी अभिनेत्री प्राजक्ता माळीची मागितली माफी!

वर्ष - 8 । अंक -172 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 31 डिसेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत


- आधी सिक्सर मारला, मग कोसळला
- जैस्वाल कॉन्स्टास यांच्यात वादावादी!
- अंतराळात स्पेसक्राफ्ट जोडणार इस्रो!
- 'घरांच्या खिडक्या झाकून टाका'!


## पिंपरी-चिंचवडमध्ये पोलिसांचा फौजफाटा तैनात राहणार

# नववर्षाचे स्वागत; जल्लोष नियमात राहूनच!

### ध्वनिप्रदूषण करणाऱ्या, वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाणार

। पिंपरी ।महाईन्यूज

**नववर्ष स्वागताच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड पोलिसआयुक्तालयाने विशेष बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. ३१ डिसेंबर रात्रीपासून १ जानेवारी २०२५ पर्यंत पोलिसांचा मोठा फौजफाटा शहरभर तैनात राहणार आहे.**





#### महत्त्वाच्या ठिकाणी बंदोबस्त

नववर्षानिमित्त धार्मिक स्थळे, मंदिरे, मशिदी, मॉल, हॉटेल, लॉज आणि सार्वजनिक ठिकाणी विशेष गस्त घालण्यात येणार आहे. महत्त्वाच्या ठिकाणी नाकाबंदी पॉइंट्सवर वाहनांची तपासणी करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल. रात्रीच्या वेळी मद्यपान करून वाहन चालवणारे, भरधाव वाहन चालवणारे आणि सार्वजनिक ठिकाणी अराजकता माजवणाऱ्यांवर विशेष लक्ष ठेवण्यात येणार आहे.

#### बेशिस्त वाहनचालकांवर कठोर कारवाई

वाहनांवरून अनधिकृतपणे कर्कश आवाज निर्माण करणारे किंवा ट्रिपल सीट वाहन चालवणाऱ्यांवर तत्काळ दंडात्मक कारवाई होणार आहे. याशिवाय, नववर्ष स्वागताच्या उत्साहात गोंगाट किंवा सार्वजनिक ठिकाणी अनुचित वर्तन करणाऱ्यांवर पोलिसांची करडी नजर राहणार आहे.

#### पोलिसांची विशेष पथके

शहरात पोलिस आयुक्त १, सहायक पोलिस आयुक्त ६, पोलिस निरीक्षक ४६, सहायक निरीक्षक/उपनिरीक्षक १५४, पोलिस अंमलदार १५२०, क्यूआरटी पथक १, एसआरपीएफ पथक ५, स्ट्रायकिंग ८ आणि वॉर्डन ७० यांची नियुक्ती केली आहे.

#### गडकिल्ले, टेकड्यांवर 'न्यू इयर सेलिब्रेशन' केल्यास कारवाई!

नवीन वर्षाचे स्वागत गडकिल्ले, अभयारण्ये किंवा शहरातील टेकड्यांवर जाऊन करायची अनेकांची इच्छा असते. परंतु, वन विभागाकडून तशी परवानगी नाही. त्यामुळे कोणीही अशा ठिकाणी जाऊन नववर्षाचे स्वागत करू नये, अन्यथा त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल, असा इशारा पुणे वन विभागाने दिला.



दरवर्षी नववर्षाच्या पूर्वसंध्येला (३१ डिसेंबर) निसर्गरम्य ठिकाणी जाऊन पर्यटकांची पार्टी करण्याची मानसिकता असते. हे लक्षात घेऊन विभागातर्फे संरक्षित गडकिल्ल्यांच्या पायथ्याशी, राखीव वन क्षेत्रात विशेष बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. रात्रभर वन कर्मचारी गस्त घालणार आहेत. तसेच स्थानिक संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या कार्यकर्त्यांसह वन विभागाचे कर्मचारी ताम्हिणी, मुळशी, सिंहगड, लोणावळ्यासह पुण्यातील टेकड्यांसह मंगळवारी (दि.३१डिसेंबर) रात्री गस्त घालतील. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे.

नागरिकांचे शहराबाहेर, निर्मनुष्य ठिकाणी, जंगलाच्या परिसरात जाऊन पार्टी करण्याचे प्रमाण वाढत आहे. गड-किल्ल्यांच्या परिसरात, जंगलालगतच्या मोकळ्या माळरानांवर, नदीकिनाऱ्यांवर बेकायदा तंबू टाकून सेलिब्रेशन केले जाते. त्यामुळे वन्यजीवांना त्याचा त्रास होतो. अनेकजण मद्यप्राशन करतात. बाटल्या तिथेच टाकतात. त्यामुळे वन्यजीवांना इजा होण्याचा धोका असतो. तसेच इतरही अनेक गैरप्रकार उघडकीस आल्याने वन विभागाने ३१ डिसेंबरच्या रात्री गस्त वाढवली आहे. जिल्ह्यातील वन क्षेत्राबरोबर मध्यवर्ती पुण्यातील टेकड्यांवर बंदोबस्त राहणार आहे.



#### ध्वनिप्रदूषण करणारे रडारवर

"नववर्ष स्वागत करताना आवाजाची मर्यादा ओलांडत ध्वनिप्रदूषण केले जाते. अशा घटना टाळण्यासाठी पोलिसांनी विशेष खबरदारी घेतली आहे. अशा उल्लंघन करणाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्याचा इशारा पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी दिला आहे.नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आम्ही विशेष खबरदारी घेतली आहे. नववर्षाचे स्वागत करताना सर्वांनी वाहतूक व सामाजिक नियमांचे पालन करावे. नियम मोडणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल.

**-दिगंबर सूर्यवंशी,**
पोलिस निरीक्षक तथा जनसंपर्क अधिकारी, पिंपरी-चिंचवड

खरंतर राखीव वनक्षेत्रात सूर्यास्तानंतर फिरण्यास बंदी आहे. नियमांची माहिती नसल्याने अनेकदा लोक जंगलांत, मोकळ्या माळरानांवर पार्टी करतात. दुर्गम भागात तंबू घेऊन जातात. शेकोट्या पेटवतात. त्यामुळे वन्यप्राण्यांच्या वावरावर बंधने येतात. आणि निसर्गाचेही नुकसान केले जाते. त्यामुळे नवीन वर्षाच्या पूर्वसंध्येला पुण्यातील टेकड्या, वन क्षेत्र आणि सिंहगडावर गस्त वाढविण्यात येणार आहे. सिंहगडावर एरवीप्रमाणेच संध्याकाळी सहा वाजल्यानंतर पर्यटकांना प्रवेश मिळणार नाही.

# मोहिनी वाघची येरवडा कारागृहात रवानगी !

## वाघ खून प्रकरणातील आरोपींच्या बँक खात्यांचा तपशील तपासणार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**हडपसर भागातील हॉटेल व्यावसायिक सतीश वाघ यांच्या खून प्रकरणात आरोपींच्या बँक खात्यांचा तपशील पोलिसांकडून तपासण्यात येणार आहे. खून प्रकरणाचा मुख्य सूत्रधार कोण आहे, या दृष्टीने तपास करण्यात येत असल्याची माहिती पोलिसांनी सोमवारी न्यायालयात दिली.**

वाघ यांचा खून करण्यासाठी सुपारी देणारी पत्नी मोहिनी हिच्यासह अन्य आरोपींच्या पोलीस कोठडीचा हक्क अबाधित ठेवून न्यायालयीन कोठडी सुनावण्यात यावी, अशी विनंती पोलिसांनी न्यायालयात केली. न्यायालयाने मोहिनी हिच्यासह अन्य आरोपींची येरवडा कारागृहात रवानगी करण्याचा आदेश दिला. सतीश वाघ यांचे अपहरण करून निर्घृण खून करण्यात आल्याची घटना १० डिसेंबर रोजी घडली. या प्रकरणाचा तपास करून पोलिसांनी वाघ यांची पत्नी मोहिनी (वय ४८), अक्षय ऊर्फ सोन्या हरीश जावळकर (वय २९, दोघे रा. फुरसुंगी फाटा), पवन श्यामसुंदर शर्मा (वय ३०, रा. आव्हाळवाडी), नवनाथ अर्जुन गुरसाळे (वय ३१, रा. वाघोली, मूळ रा. बीड), विकास ऊर्फ विक्की सीताराम शिंदे (वय २८, रा. वाघोली, मूळ रा. अहिल्यानगर), अतिश संतोष जाधव (वय २०, रा. लोणीकंद, मूळ रा. धाराशिव) यांना अटक केली. वाघ यांचा खून करण्यासाठी मोहिनी हिने आरोपींना पाच लाखांची सुपारी दिल्याचे तपासात निष्पन्न झाले होते.या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या आरोपींना लष्कर न्यायालयात हजर करण्यात आले. आरोपींच्या बँक खात्यांचा तपशील (स्टेटमेंट) तपासायचा आहे. खून प्रकरणाचा मुख्य सूत्रधार कोण आहे, या दृष्टीने तपास करायचा आहे. तपासासाठी आरोपींच्या पोलीस कोठडीचा हक्क अबाधित ठेवावा. त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावण्यात यावी, अशी विनंती सरकारी वकील ज्योती वाघमारे यांनी युक्तिवादात केली. आरोपी जाधव आणि गुरसाळे यांनी वाघ यांचा खून करण्यासाठी वापरलेले शस्त्र पेरणे फाटा येथील भीमा नदीपात्रात टाकून दिला आहे. पोलिसांनी पाणबुड्यांच्या मदतीने शस्त्राचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांना शस्त्र सापडले नाही, असे सरकारी वकील वाघमारे यांनी सांगितले.





प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी प्रचेता राठोड यांनी आरोपींची येरवडा कारागृहात न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्याचे आदेश दिले.या खून प्रकरणात २२ साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात येणार आहे, तसेच तपासाच्या अनुषंगाने त्यांच्याकडे चौकशीही करण्यात येणार आहे. आरोपींनी खून करण्यासाठी वापरलेले दांडके, चाकू जप्त करण्यात आले आहेत. आरोपींनी अपहरण करण्यासाठी वापरलेली मोटार, दुचाकी जप्त केली आहे. वाघ यांचा खून करण्यासाठी दिलेली दीड लाखांची रोकड, आरोपींचे कपडे जप्त करण्यात आले आहेत. आरोपींच्या मोबाइल क्रमांकाचे तांत्रिक विश्लेषण करण्यात आले आहे, अशी माहिती पोलिसांनी न्यायालयात दिली.वाघ यांचा खून करण्यासाठी सुपारी देणारी पत्नी मोहिनी हिच्यासह अन्य आरोपींच्या पोलीस कोठडीचा हक्क अबाधित ठेवून न्यायालयीन कोठडी सुनावण्यात यावी, या प्रकरणाचा तपास करून पोलिसांनी वाघ यांची पत्नी मोहिनी, अक्षय ऊर्फ सोन्या हरीश जावळकर , पवन श्यामसुंदर शर्मा, नवनाथ अर्जुन गुरसाळे विकास ऊर्फ विक्की सीताराम शिंदे (वय २८, रा. वाघोली, मूळ रा. अहिल्यानगर), अतिश संतोष जाधव (वय २०, रा. लोणीकंद,मूळ रा. धाराशिव) यांना अटक केली.

### खून प्रकरणाचा मुख्य सूत्रधार कोण

वाघ यांचा खून करण्यासाठी मोहिनी हिने आरोपींना पाच लाखांची सुपारी दिल्याचे तपासात निष्पन्न झाले होते.या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या आरोपींना लष्कर न्यायालयात हजर करण्यात आले. आरोपींच्या बँक खात्यांचा तपशील (स्टेटमेंट) तपासायचा आहे. खून प्रकरणाचा मुख्य सूत्रधार कोण आहे, या दृष्टीने तपास करायचा आहे. त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावण्यात यावी, अशी विनंती सरकारी वकील ज्योती वाघमारे यांनी युक्तिवादात केली. आरोपी जाधव आणि गुरसाळे यांनी वाघ यांचा खून करण्यासाठी वापरलेले शस्त्र पेरणे फाटा येथील भीमा नदीपात्रात टाकून दिला आहे. पोलिसांनी पाणबुड्यांच्या मदतीने शस्त्राचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांना शस्त्र सापडले नाही, असे सरकारी वकील वाघमारे यांनी सांगितले. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी प्रचेता राठोड यांनी आरोपींची येरवडा कारागृहात न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्याचे आदेश दिले.

# गोव्यातून आणलेला सव्वा कोटींचा मद्यसाठा जप्त

## नववर्षाच्या पार्श्वभूमीवर उत्पादन शुल्क विभागाची कारवाई

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**नववर्षाच्या पार्श्वभूमीवर गोव्याहून तस्करी करून आणलेला एक कोटी २० लाख रुपयांचा मद्यसाठा जप्त राज्य उत्पादन शुल्क विभागाने जप्त केला. या कारवाईत एक हजार ६६८ मद्याच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या. याप्रकरणी उत्पादन शुल्क विभागाकडून नऊ जणांना अटक करण्यात आली. निगडी आणि नसरापूर भागात ही कारवाई करण्यात आली.**



नववर्षाच्या पार्श्वभूमीवर शहरात मोठ्या प्रमाणावर गोव्यातील मद्य विक्रीस पाठविण्यात येणार असल्याची माहिती उत्पादन शुल्क विभागाला मिळाली होती. गोवा, तसेच केरळमधून मद्याची बेकायदा तस्करी केली जाते. नववर्षाच्या पार्श्वभूमीवर गैरप्रकार रोखण्यासाठी उत्पादन शुल्क विभागाने पथके तयार केली आहेत. खासगी बसमधून गोव्यातील मद्याच्या बाटल्या विक्रीस पाठविण्यात येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर निगडीतील एका प्रवासी वाहतूक करणाऱ्या खासगी बसच्या थांब्यावर सापळा लावून कारवाई करण्यात आली. या कारवाईत गोव्यातील मद्याच्या एक हजार ६६८ बाटल्या जप्त करण्यात आल्या, अशी माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक चरणसिंह रजपूत यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी उपअधीक्षक सुजीत पाटील, संतोष जगदाळे उपस्थित होते. याप्रकरणी प्रवासी वाहतूक करणाऱ्या बसचा चालक आणि मदतनीस यांना अटक करण्यात आली. निगडीतून मद्याच्या बाटल्या खडकी भागात विक्रीस पाठविण्यात येणार असल्याची माहिती चौकशीत मिळाली. त्यानंतर पोलिसांनी खडकी भागातून पाच जणांना अटक केली. त्यांच्याकडून ६८ लाख ३७ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. पुणे-सातारा महामार्गावरील नसरापूर येथे केलेल्या कारवाईत ५१ लाख ९५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. एका गोदामात मद्यसाठा लपवून ठेवण्यात आल्याची माहिती मिळाली होती. पथकाने तेथे कारवाई करुन चार आरोपींना अटक केली. त्यांच्याकडून मद्यसाठा जप्त करण्यात आला.नववर्षाच्या पार्श्वभूमीवर गोव्याहून तस्करी करून आणलेला एक कोटी २० लाख रुपयांचा मद्यसाठा जप्त राज्य उत्पादन शुल्क विभागाने जप्त केला. या कारवाईत एक हजार ६६८ मद्याच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या.

### मद्याची बेकायदा तस्करी

उत्पादन शुल्क विभागाकडून नऊ जणांना अटक करण्यात आली. निगडी आणि नसरापूर भागात ही कारवाई करण्यात आली. नववर्षाच्या पार्श्वभूमीवर शहरात मोठ्या प्रमाणावर गोव्यातील मद्य विक्रीस पाठविण्यात येणार असल्याची माहिती उत्पादन शुल्क विभागाला मिळाली होती. गोवा, तसेच केरळमधून मद्याची बेकायदा तस्करी केली जाते. नववर्षाच्या पार्श्वभूमीवर गैरप्रकार रोखण्यासाठी उत्पादन शुल्क विभागाने पथके तयार केली आहेत. खासगी बसमधून गोव्यातील मद्याच्या बाटल्या विक्रीस पाठविण्यात येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर निगडीतील एका प्रवासी वाहतूक करणाऱ्या खासगी बसच्या थांब्यावर सापळा लावून कारवाई करण्यात आली.

### मालमत्ताधारकांनी मालमत्ताकराचे बिल मिळाल्याची खात्री करावी

# नागरिकांनी लवकरात लवकर मालमत्ताकराचा भरणा करावा!

**। पिंपरी-चिंचवड ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**पिंपरी-चिंचवड शहरामध्ये ६ लाखाहून अधिक नोंदणीकृत मालमत्ता आहेत. नोंदणीकृत मालमत्तांना मालमत्ताकराचे बिल वेळेमध्ये पोहोचवण्यासाठी करसंकलन विभागाकडून 'प्रकल्प सिध्दी'उपक्रम राबविण्यात आला. महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून शहरातील महिला बचत गटांच्या महिलांना शहरामध्ये मालमत्ताकराचे बिल वाटप करण्यासाठी नेमण्यात आले.**






प्रकल्प सिध्दी उपक्रमाच्या माध्यमातून करसंकलन विभागाने निर्माण केलेल्या मोबाईल ॲप्लिकेशनच्या माध्यमातून मालमत्ताधारकांची माहिती अपडेट करण्यात आली. त्यासोबत, मालमत्तांचे अक्षांश-रेखांश, बिल वाटप केल्याची वेळ, बिल वाटप करतानाचा फोटो आदी माहितीचे संकलन करण्यात आले. चालू आर्थिक वर्षामध्ये एप्रिल महिन्यामध्येच ऑनलाईन स्वरुपामध्ये मालमत्ता कराची बिले उपलब्ध करण्यात आली. त्याबरोबरच, करसंकलन विभागाने नागरिकांना सवलतींचा लाभ मिळावा यासाठी बिलाच्या वितरण प्रक्रियेमध्ये सुधारणा करुन बिल वाटपाची प्रक्रियेमध्ये गतिशीलता निर्माण होण्यासाठी पुढाकार घेतला. चालू आर्थिक वर्षामध्ये ५,३२,९९९ मालमत्तांना प्रकल्प सिध्दी उपक्रमाच्या माध्यमातून बिलांचे वितरण करण्यात आले. बिल वितरित केल्यानंतर ज्या मालमत्तांच्या दारावर बिल अटकविण्यात आले व ज्या मालमत्ताधारकांकडे बिल सुपुर्द करण्यात आले, अशा सर्वांचे छायाचित्र सुध्दा ॲप्लिकेशनद्वारे संकलित करण्यात आले. त्यामुळे करसंकलन विभागाकडे ज्यांना बिल बजाविण्यात आले आहे अशांची इत्यंभूत माहिती असून, ज्या नागरिकांना बिल मिळाले नाही अशा नागरिकांनी आपले बिल ऑनलाईन स्वरुपामध्ये महानगरपालिकेच्या www. pcmcindia.gov.in या संकेतस्थळावरुन उपलब्ध करुन घ्यावे. त्यासोबतच, संबंधित करसंकलन विभागीय कार्यालयामध्ये किंवा सारथी हेल्प लाईन क्रमांक ८८८८००६६६६ या क्रमांकावर संपर्क करुन आपल्या बिल वितरित करण्यात आले आहे का याची खात्री करावी. असे कर आकारणी व कर संकलन विभागाकडून मालमत्ताधारकांना आवाहन करण्यात आले आहे.

सध्या ज्या मालमत्ताधारकांनी अद्यापही मालमत्ताकराचा भरणा केला नाही अशा नागरिकांना करसंकलन विभाग एसएमएस, टेलीकॉलिंग यामाध्यमातून कर भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. नागरिकांनी लवकरात लवकर कराचा भरणा करुन विभागाकडून करण्यात येणारी कारवाई टाळावी यासाठी नागरिकांना विविध प्रकारे आवाहन करण्यात येत आहे.

### करसंकलन विभागाकडून बिल न मिळालेल्यांनी करसंकलन विभागास संपर्क करण्याचे आवाहन

"पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने शहरातील मालमत्ताधारकांपर्यंत वेळेमध्ये बिलांचे वाटप व्हावे यासाठी व बिलावरील माहितीमध्ये सुधारण्यासाठी प्रकल्प सिध्दी उपक्रम राबविला. यामाध्यमातून मालमत्तेच्या माहितीमध्ये दुरुस्त्या करण्यात येऊन ती अद्ययावत करण्यात आली. त्यामुळे आता मालमत्ताधारकांना मालमत्ता कराबाबत एसएमएस द्वारे माहिती पोहोचत आहे. महानगरपालिकेच्या प्रकल्प सिध्दी उपक्रमाने करसंकलन विभागामध्ये विधायक बदल घडवून आणला असून करसंकलनामध्ये त्याचा सकारात्मक परिणाम दिसून आलेला आहे. ज्या नागरिकांना अद्याप बिल मिळाले नसेल अशा नागरिकांनी ऑनलाईन स्वरुपात बिल उपलब्ध करुन अथवा करसंकलन विभागामध्ये संपर्क साधून आपले बिल उपलब्ध करुन कराचा भरणा करावा."

**–प्रदीप जाभंळे पाटील,**
अतिरिक्त आयुक्त (१), पिंपरी–चिंचवड महानगरपालिका

"ज्या मालमत्ताधारकांना अद्याप बिल मिळाले नसेल अथवा बिल वितरित करतेवेळी बिल स्विकारण्यास अनुपस्थिती असेल अशा मालमत्ताधारकांनी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर जाऊन मालमत्ता क्रमांकाद्वारे आपले बिल उपलब्ध करावे. महानगरपालिकेच्या संकेतस्थळावरुन बिल उपलब्ध करणे सुलभ व सुरक्षित असून तात्काळ आपल्या कराचा भरणा करावा. नागरिकांना मालमत्ताकर भरण्याचे येणारे एसएमएस नागरिकांना जागरुक करण्यासाठी असून ज्या नागरिकांनी मालमत्ता कराचा भरणा केला आहे तरी त्यांना एसएमएस येत असतील तर अशा तांत्रिक बाबींवर विभाग तातडीने दुरुस्ती करणार आहे. नागरिकांना वेळेमध्ये बिल देण्यासाठी करसंकलन विभागाने आवश्यक प्रयत्न केले असून अद्यापही बिल मिळाले नसेल अशा मालमत्ताधारकांनी सारथी हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क करावा अथवा संबंधित विभागीय कार्यालयामध्ये संपर्क करावा."

**– अविनाश शिंदे,** सहाय्यक आयुक्त, कर आकारणी व कर संकलन विभाग, पिंपरी–चिंचवड महानगरपालिका


---

### मराठी नक्षत्र महाकाव्यसंमेलन स्वागताध्यक्षपदी आ. शंकर जगताप

## अखिल भारतीय मराठी नक्षत्र महाकाव्यसंमेलन 17 व 18 मे 2025 रोजी पिंपरी- चिंचवडमध्ये होणार

**।पिंपरी।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**भोसरी येथील नक्षत्राचं देणं काव्यमंचच्या वतीने आठवे अखिल भारतीय मराठी नक्षत्र महाकाव्यसंमेलन 17 व 18 मे 2025 रोजी पिंपरी-चिंचवडमध्ये होणार आहे. या महाकाव्यसंमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी आमदार शंकर जगताप यांची एकमताने निवड करण्यात आली आहे.**



यावेळी नक्षत्राचं देणं काव्यमंचचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. राजेंद्र सोनवणे, सुप्रसिद्ध निवेदक व विचारवंत श्रीकांत चौगुले, अभियंता विजय कांबळे, सामाजिक कार्यकर्ते मिलिंद घोगरे यांच्या शुभहस्ते निवडपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी निवड पत्र स्वीकारताना आमदार जगताप म्हणाले की, हा भव्य सोहळा आपल्या पिंपरीच्या शहरात संपन्न होत आहे याचा आनंद आहे. हे महाकाव्यसंमेलन अतिशय देखणे आणि सुंदर करण्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केला. कवींसाठी गेली २५ वर्ष शहरांमध्ये व संपूर्ण महाराष्ट्रात सातत्यपूर्ण काम करणारे अतिशय क्रियाशील संस्था आहे. त्यांनी केलेले या बहुमानाचा मी स्वीकार करून सर्वपरीने सहकार्य करण्याचा प्रयत्न केला जाईल. अशी त्यांनी ग्वाही दिली.

या दोन दिवसाच्या आठव्या अखिल भारतीय नक्षत्र महाकाव्यसंमेलनात महाराष्ट्रातील सर्व कवी कवयित्रींना व विचारवंतांचा विनामूल्य सहभाग असणार आहे. तसेच प्रत्येक सहभागीना काव्य सादर करण्याची संधी दिली जाणार आहे. सहभागींना चहा, नाश्ता, भोजन व निवास व्यवस्था विनामूल्य करण्यात आली आहे. तसेच प्रत्येकाला आकर्षक सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. या महाकाव्यसंमेलनासाठी अध्यक्ष म्हणून नामवंत कवी म. भा. चव्हाण हे उपस्थित राहणार आहे. संपूर्ण हा सोहळा अतिशय दिमाखात संपन्न करण्याचा आयोजकाचा प्रयत्न आहे. काव्यग्रंथ दिंडी, उद्घाटन सोहळा, विविध परिसंवाद, विविध काव्य मैफल, प्रकट मुलाखत, काव्यसंग्रह प्रकाशन, स्मरणिका प्रकाशन या वेळी करण्यात येणार आहे. या महाकाव्यसंमेलनासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून अनेक विचारवंत, कवी, साहित्यिक तसेच अनेक मान्यवर मंडळी उपस्थित राहणार आहेत.

### वातावरणीय घटकांची माहिती महापालिकेला पुरवली जाणार

"एक्स-बँड डॉप्लर वेदर रडार" एक अत्याधुनिक स्वदेशी रडार प्रणाली आहे. या प्रणालीचे कार्यपरिक्षेत्र सुमारे १०० किलोमीटर परिघात असणार आहे. यामध्ये पिंपरी-चिंचवड शहरासह पुणे जिल्ह्याच्या संपूर्ण क्षेत्राचे, गड परिसर आणि आसपासच्या भागांचे समावेश असणार आहे. आपत्तीजनक हवामान घटनांची वास्तविक-समय निरीक्षण क्षमता, अत्याधिक पाऊस, वादळ, गारपीट, इत्यादींचा अभ्यास करण्यासाठी या रडारप्रणालीद्वारे महत्त्वपूर्ण माहिती मिळणार आहे. पिंपरी-चिंचवड शहरावर परिणाम करणाऱ्या वातावरणीय घटकांची माहिती महापालिकेला वेळोवेळी पुरवली जाणार असल्याचे के.एस.होसाळीकर यांनी यावेळी सांगितले.

# बीडमधील वणव्यात प्राजक्ताची होरपळ !

**बीडमध्ये जो काही वणवा पेटला आहे, तो माणूसकीला नक्कीच शोभेसा नाही. मुळात एखाद्याचा अमानुषपणे खून होणे, ही घटना माणुसकीला काळीमा फासणारी आहे. पण, त्याचे भांडवल करून एकमेकांच्या अब्रूची लक्तरे बीडच्या वेशीवर टांगण्याचे नवीन धंदे सुरू झाले आहेत. या प्रकरणाचा तपास होईल, त्यातील सत्य बाहेरही येईल, पण तोपर्यंत आंदोलने करून, मोर्चे काढून एकमेकांवर जी चिखलफेक सुरू आहे, ती महाराष्ट्रासाठी नक्कीच भूषणावह नाही. तसं पाहिलं तर आणि या प्रकरणाच्या तळापर्यंत शोध घेतला तर हा वणवा पेटला आहे तो मराठा समाज विरुद्ध ओबीसी यांच्यात !**



'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

मराठा समाजाचे नेते याविषयी अनेक उलट-सुलट वक्तव्ये करून हा प्रश्न आणखीच चिघळवत आहेत, हे सकृतदर्शनी दिसत आहे आणि मुख्य म्हणजे या प्रकरणाचा तपास सुरू असल्यामुळे त्याबाबत टिप्पणी करणे किंवा अकलेचे तारे तोडणे पूर्णपणे चुकीचे आहे. परंतु, मराठा समाजाच्या उन्नतीचा ठेका घेतलेले काही दलाल घटनास्थळी जातात आणि भडकवणारे वक्तव्य करतात, हे प्रथम बंद व्हायला पाहिजे !

### प्राजक्ता माळीचा संबंध काय ?

खून प्रकरणासंदर्भात आरोप प्रत्यारोप होणे, हे एक वेळ मान्य करू या. पण, भारतीय जनता पार्टीच्या सुरेश धस या आमदाराने विनाकारण अभिनेत्री प्राजक्ता माळीचे नाव घेऊन हा विषय आणखी भरडत ठेवला आहे. बरं, प्राजक्ताचे नाव खून प्रकरणात नाही, तर 'इव्हेंट मॅनेजमेंट' शी जोडून त्यांनी द्राविडी प्राणायाम केला आहे. प्राजक्ता माळी यांचे नाव घेऊन त्यांना कॅबिनेट मंत्री धनंजय मुंडे यांना बदनाम करायचे आहे, हे सर्वजणच जाणतात, हे लक्षात घेऊ या.
मराठा विरुद्ध ओबीसी समाजाच्या या वणव्यामध्ये प्राजक्ता माळीची मात्र होरपळ झाली आहे, हे नक्की. काल तिने पत्रकार परिषद घेऊन बऱ्यापैकी खुलासा केला असला तरी आरोपांची जखम खुलाशाच्या मलमाने बरी होत नाही, हा तर समाज माध्यमांचा पाया आहे !

### आरोपांची अत्यंत खालची पातळी

अत्यंत संवेदनशील अभिनेत्री प्राजक्ता माळीला एखाद्या आरोपाबाबत खुलासा करण्यासाठी पत्रकार परिषद घ्यावी लागणे, हे केवळ एकमेव प्राजक्ता माळीचे दुर्दैव नाही, तर आपल्या राजकारणाचे आणि पत्रकारितेचेही दुर्दैव आहे. राजकारणी आजकाल बोलताना संयम पाळत नाहीत. सुरेश धस या आमदाराने



आपल्याजी काही मुक्ताफळे उधळली, त्यामुळे प्राजक्ता माळीचे व्यथित होणे स्वाभाविक होते. सुरेश धस यांनी केलेले वक्तव्य अत्यंत हीन आणि खालच्या पातळीवरील शकुनीच्या दर्जाचे होते. सुरेश धस यांची मानसिकता तर अत्यंत हीन दर्जाची होती. स्त्री ही कुठलीही असो, तिच्या अब्रूची लक्तरे अशा भाषेत बाहेर काढणे, हे कोणाही महिलेसाठी अत्यंत क्लेशदायक असते. सुरेश धस ज्या पद्धतीने महिलांच्या बाबतीत बोलले, तसे पुरुषांच्या बाबतीत का नाही बोलले? हा प्रश्न आहे. पुरुषांची अब्रू ..अब्रू असते आणि स्त्रीची अब्रू.. अब्रू नसते काय? सुरेश धस यांनी सत्ताधारी पक्षाचा एक जबाबदार आमदार असताना असले अत्यंत हीन दर्जाचे सडकछाप वक्तव्य अजिबात केले नसते. धस यांनी बोलता बोलता जी काही मुक्ताफळे उधळली आहेत, त्यामुळे संपूर्ण समाज माध्यमांना एकदम जोर चढला असून त्यांच्या लेखणीला किंवा हातात असलेल्या 'बूम' ला एकदम फार चढली आहे.

### कलावंत असणे चूक आहे का ?

कलावंतांना कलावंत म्हणून जी भूमिका पार पाडावी लागते. त्या भूमिकेचा आणि त्यांच्या एकूण वर्तनाचा वाटेल तसा अर्थ काढणे. हे अत्यंत चुकीचे आहे. या प्रकरणात प्राजक्ता माळीबरोबर त्यांची आई होती, त्यांचा भाऊ होता. त्या सर्वांच्या चेहऱ्यावर असलेली उदासी अगदी स्पष्टपणे दिसत होती. आपली आई हे वक्तव्य ऐकल्यापासून झोपलेली नाही, असे प्राजक्ताने सांगितले. आपल्या प्रतिभावान आणि यशस्वी मुलीच्या बाबतीत एका आईने हळवे होणे, अत्यंत स्वाभाविक आहे. महिलेची अब्रू काचेसारखी असते. एकदा तडा गेला तर काय होईल, हे सांगता येत नाही. सुरेश धस यांनी आपल्या विधानाबद्दल माझी माफी मागावी, अशी साधी विनंती प्राजक्ता माळीने केली होती. त्यावर सुरेश धस यांनी निर्लज्जपणे आपण माफी मागणार नाही, असे म्हणणे म्हणजे हा हलकटपणाचा कळस आहे. जनतेने तुम्हाला आमदार म्हणून निवडून दिले आहे. तुम्ही खूप दमदार आहात, म्हणजे तुम्हाला वाटेल तसे बोलण्याचा परवाना मिळालेला नाही. प्राजक्ता माळीची आतापर्यंतची कारकीर्द अतिशय यशस्वी आहे. प्राजक्ताच्या वागण्यातील अदब तसेच अनेक नामवंत कलावंतांसोबत फिल्मी दुनियेत राहूनही आपली वेगळी ओळख निर्माण करण्याचे कौशल्य आणि कसब सर्वांनाच ठाऊक आहे. कलावंतांना अनेकदा अनेक ठिकाणी जावे लागते. अनेक कार्यक्रम करावे लागतात,अशा एखाद्या कार्यक्रमात कोणी सत्कार केला आणि त्याचे फोटो काढल्यावर, त्यातून भलत्याच मानसिकतेने भलतेसलते अर्थ शोधून काढणे आणि त्यावरून चारित्र्यहनन करणे हा प्राजक्ता म्हणते त्याप्रमाणे गुन्हाच आहे, हे निक्षून सांगावेसे वाटते.

प्राजक्ता माळीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे जाऊन आपली व्यथा मांडली. सुरेश धस भाजपाचे आमदार असल्यामुळे त्यांच्याबाबत फडणवीस हे काय भूमिका घेतात हे पाहणे आता महत्त्वाचे ठरणार आहे.

दरम्यानच्या काळात प्राजक्ता माळी या अत्यंत प्रांजळपणे, कोणाचीही भीडभाड न बाळगता आपल्या बावनकशी बुद्धीच्या जोरावर ज्या हिमतीने पत्रकारांच्या समोर आल्या आणि आपली बाजू मांडून आपल्याला काय क्लेश झाले आहेत, ते सांगितले, त्याबद्दल प्राजक्ता निश्चितच अभिनंदनास पात्र आहे.

### काय होणार खूनप्रकरणाचे ?

बीड जिल्ह्यातील खून प्रकरणाचा तपास युद्धपातळीवर सुरू आहे. त्यातील मुख्य आरोपी वाल्मीक कराड आणि त्याचे साथीदार फरारी आहेत. हे सर्वजण मंत्री धनंजय मुंडे यांचे साथीदार आहे आणि सर्व प्रकरण आता फडणवीस यांच्या कोर्टात आहे. आपला रामशास्त्री बाणा ते कसे जपतात आणि प्राजक्ता माळी तसेच या खून प्रकरणाला न्याय देतात, हे पाहणे उचित ठरणार आहे !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करा!

## प्राजक्ता माळी प्रकरणात महिला आयोगाने मोठे पाऊल





**। मुंबई ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात राज्याचे कॅबिनेट मंत्री धनंजय मुंडे यांना लक्ष्य करत असताना अभिनेत्री प्राजक्ता माळी यांचा नामोल्लेख केला होता. परळीत इव्हेंट मॅनेजमेंट पॉलिटिक्सचा वेगळाच परळी पॅटर्न आहे. याठिकाणी मोठमोठ्या सेलिब्रिटी येत असल्याचे सांगून धस यांनी काही महिला कलाकारांची नावे घेतली होती. यानंतर अभिनेत्री प्राजक्ता माळी यांनी महिला आयोगाकडे तक्रार दाखल केली होती. या प्रकरणात आता महिला आयोगाने मोठे पाऊल उचलले असून मुंबई पोलिसांना निर्देश दिले आहेत.**

अभिनेत्री प्राजक्ता माळी यांची तक्रार आयोग कार्यालयास प्राप्त झाली आहे. त्याचा अभ्यास करून, कायदेशीर बाबी तपासून आवश्यक ती कार्यवाही नियमानुसार आयोग करेल, असे विधान राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी काल केले होते. याबाबत त्यांनी एक्सवर एक पोस्टही केली होती. त्यानंतर आता राज्य महिला आयोगाच्या एक्स अकाउंटवर कारवाईबाबत माहिती देण्यात आली आहे. या पोस्टमध्ये म्हटले आहे की, महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालयाला प्राजक्ता माळी यांचा तक्रार अर्ज प्राप्त झाला आहे. बीड जिल्ह्यातील आमदार सुरेश धस यांनी श्रीमती माळी यांच्याबद्दल केलेले कथित अयोग्य, अवमानकारक व बदनामीकारक विधान तसेच त्यांनंतर सोशल मीडियावर प्रसिद्ध होत असलेल्या बदनामीकारक बातम्या यामुळे त्यांच्या वैयक्तिक व सामाजिक जीवनावर त्याचे परिणाम होत असल्याचे त्यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. सदर प्रकरण अतिशय गंभीर स्वरूपाचे असून महिलेच्या प्रतिष्ठेस बाधा पोहोचवणारे असल्याने राज्य महिला आयोगाने मुंबई पोलीस आयुक्त यांना याप्रकरणी तातडीने कारवाई करण्याचे निर्देश दिले असून वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करण्याची सूचना केली आहे, असे महिला आयोगाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.सुरेश धस यांनी प्राजक्ता माळी यांची माफी मागितली आहे. प्राजक्ता माळी यांच्याबद्दल केलेल्या वक्तव्याप्रकरणी सुरेश धस यांनी दिलगिरी व्यक्त केली आहे. मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर बोलताना आमदार सुरेश धस यांनी अभिनेत्री प्राजक्ता माळी यांच्या नावाचा उल्लेख केला होता. यावरून वातावरण चांगलंच तापलं होतं. त्यानंतर प्राजक्ता माळी यांनी पत्रकार परिषद घेऊन सुरेश धस यांनी आपली माफी मागवी अशी मागणी केली होती. मात्र मी काही चुकीचं बोललो नाही, प्राजक्ता ताईंचा अपमान होईल असं बोललो नाही, मी माझ्या वक्तव्याचं समर्थन करतो त्यामुळे माफी मागणार नाही अशी भूमिका यावर सुरेश धस यांनी घेतली होती. मात्र त्यांनी आता प्राजक्ता माळी यांची माफी मागितली आहे. प्राजक्ताताई माळी यांच्या संदर्भात मी केलेल्या वक्तव्याचा गैर अर्थ काढण्यात आला आहे, मला त्यांचा अपमान करायचा नव्हता किंवा त्यांच्या चारित्र्याबाबत बोलण्याचा तर प्रश्नच नव्हता. मी प्राजक्ता ताई आणि समस्त स्त्रियांबाबत आदर बाळगतो. माझ्या विधानाने जर त्यांचे किंवा कुणाचेही मन दुखावले असेल तर मी दिलगिरी व्यक्त करतो, असं सुरेश धस यांनी म्हटलं आहे. सुरेश धस यांच्या वक्तव्यानंतर प्राजक्ता माळी यांनी पत्रकार परिषद घेतली होती, या पत्रकार परिषदेमधून त्यांनी आपली भूमिका मांडली. सुरेश धस यांनी आपली माफी मागावी अशी मागणी त्यांनी केली होती. त्यानंतर मी प्राजक्ता ताईंचा अपमान होईल असं बोललो नाही, त्यामुळे मी माफी मागणार नाही असं सुरेश धस यांनी म्हटलं होतं.

त्यानंतर याच संदर्भात प्राजक्ता माळी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची देखील भेट घेतली होती. अखेर आता सुरेश धस यांनी प्राजक्ता माळी यांची माफी मागितली आहे. मी प्राजक्ता ताई आणि समस्त स्त्रियांबाबत आदर बाळगतो. माझ्या विधानाने जर त्यांचे किंवा कुणाचेही मन दुखावले असेल तर मी दिलगिरी व्यक्त करतो, असं सुरेश धस यांनी म्हटलं आहे.

भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात राज्याचे कॅबिनेट मंत्री धनंजय मुंडे यांना लक्ष्य करत असताना अभिनेत्री प्राजक्ता माळी यांचा नामोल्लेख केला होता. परळीत इव्हेंट मॅनेजमेंट पॉलिटिक्सचा वेगळाच परळी पॅटर्न आहे. याठिकाणी मोठमोठ्या सेलिब्रिटी येत असल्याचे सांगून धस यांनी काही महिला कलाकारांची नावे घेतली होती. यानंतर अभिनेत्री प्राजक्ता माळी यांनी महिला आयोगाकडे तक्रार दाखल केली होती.

### आमदार सुरेश धस नरमले

सुरेश धस यांनी प्राजक्ता माळी यांची माफी मागितली आहे. प्राजक्ता माळी यांच्याबद्दल केलेल्या वक्तव्याप्रकरणी सुरेश धस यांनी दिलगिरी व्यक्त केली आहे. मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर बोलताना आमदार सुरेश धस यांनी अभिनेत्री प्राजक्ता माळी यांच्या नावाचा उल्लेख केला होता. यावरून वातावरण चांगलंच तापलं होतं. त्यानंतर प्राजक्ता माळी यांनी पत्रकार परिषद घेऊन सुरेश धस यांनी आपली माफी मागवी अशी मागणी केली होती. मात्र मी काही चुकीचं बोललो नाही, प्राजक्ता ताईंचा अपमान होईल असं बोललो नाही, मी माझ्या वक्तव्याचं समर्थन करतो त्यामुळे माफी मागणार नाही अशी भूमिका यावर सुरेश धस यांनी घेतली होती. मात्र त्यांनी आता प्राजक्ता माळी यांची माफी मागितली आहे.

# ...तर बायको पळून जाईल : गौतम अदाणी

## अर्थव्यवस्थांशी स्पर्धा करण्यासाठी तरुणांनी जास्तवेळ काम केले पाहिजे

**। मुंबई ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**भारतात गेल्या काही दिवसांपासून कामाच्या ठिकाणी वातावरण कसे असते याबद्दल वेगवेगळ्या चर्चा होताना दिसत आहेत. यामध्ये वर्क लाइफ बॅलेन्स हा देखील महत्त्वाचा मुद्दा ठरत आहे. यादरम्यान उद्योगपती गौतम अदाणी यांनी काम आणि तुमचे खाजगी आयुष्य यामधील समतोल साधण्याबद्दल त्यांचे मत मांडले आहे.**

एका मुलाखतीत बोलताना अदाणी यांनी खाजगी आयुष्य आणि काम या दोन्हीमध्ये संतुलन साधताना कोणत्या गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत याबद्दल भाष्य केले आहे. अदाणी म्हणाले की, जे करण्यात तुम्हाला आनंद वाटतो, ते तुम्ही करत असाल तर तुमचे काम आणि खाजगी आयुष्य यामध्ये संतुलन आहे. याखेरीज तुमचे वर्क-लाइफ बॅलेन्स माझ्यावर लादले जाऊ नये आणि माझे वर्क-लाइफ बॅलेन्स तुमच्यावर लादले जाऊ नये. तुम्ही फक्त हे लक्षात घ्यायचे आहे की, मी माझ्या कुटुंबासोबत चार तास घालवत आहे आणि मला त्यामधून आनंद मिळतोय... कोणीतरी आठ तास घालवत आहे.. जर आठ तास घालवत असेल तर बायको



पळून जाईल. पुढे बोलताना काम आणि खाजगी आयुष्य यांच्यात संतुलन ठेवण्यासाठी एकमेकांचा आनंद आणि वैयक्तिक समाधान असणे आवश्यक असल्याचा मुद्दा देखील अदाणी यांनी पुढे मांडला. ते म्हणाले की, सांगण्याची गोष्ट ही आहे की, तुम्हाला आनंद येत असेल आणि समोरच्या व्यक्तीलाही आनंद येत असेल तर हेच वर्क लाइफ बॅलन्स आहे. इन्फोसिसचे संस्थापक एन. आर . नारायण मूर्ती यांन गेल्या वर्षी आठवड्यामध्ये ७० तास काम करण्याचे समर्थन केले होते. यानंतर या मुद्द्यावर देशभरात चर्चा सुरू झाल्या होत्या. मूर्ती यांनी देशाची उत्पादकता वाढवणे आणि जागतिक स्तरावर इतर प्रगत अर्थव्यवस्थांशी स्पर्धा करण्यासाठी भारतीय तरुणांनी जास्तवेळ काम केले पाहिजे असे म्हटले होते. त्यांच्या विधानावरून वाद सुरू झाल्यानंतर स्पष्टीकरण देताना मूर्ती म्हणाले होते.

### मला सोशल मीडियावर ट्रोल केले

१९६१ मध्ये मला प्री-यूनिव्हर्सिटी दिवसांपासून शिष्यवृत्ती मिळाली होती. आणि माझ्या अनेक समवयस्कांना सरकारी अनुदानित शिक्षणाचा लाभ मिळाला होता. आपल्यापैकी ज्यांनी असे फायदे मिळाले आहेत त्यांनी समाजाच्या भल्यासाठी कठोर परिश्रम घेणे हे देशाचे देणे लागते. ओलाचे सीईओ भाविश अग्रवाल यांनी देखील नारायण मूर्ती यांच्या ७० तास काम करण्याच्या सल्ल्याला पाठिंबा दर्शवला होता. एका पॉडकास्टमध्ये बोलताना अग्रवाल यांनी सांगितेल की, मी जेव्हा मूर्ती यांच्या विधानाला मी जाहीरपणे पाठिंबा दिला आणि मला सोशल मीडियावर ट्रोल करण्यात आले.

# अंतराळात जोडणार इस्रो स्पेसक्राफ्ट!

## स्पेडेक्स मिशन : चंद्रावरून नमुने आणण्याचे यश अवलंबून

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**इस्रोने आज 30 डिसेंबर रोजी रात्री 10 वाजता श्रीहरिकोटा येथून स्पेडेक्स म्हणजेच अंतराळ डॉकिंग प्रयोग मोहीम प्रक्षेपित केली. हे PSLV-C60 रॉकेटने प्रक्षेपित करण्यात आले. या मोहिमेत बुलेटच्या वेगापेक्षा दहापट वेगाने अंतराळात प्रवास करणारी दोन स्पेसक्राफ्ट जोडली जाणार आहेत.**



ही मोहीम यशस्वी झाली तर भारत अंतराळात स्पॅडेक्स अर्थात डॉकिंग – अनडॉकिंगची क्षमता प्राप्त करणार आहे. सध्या ही क्षमता अमेरिका, रशिया आणि चीन या तीन देशांकडेच आहे. भारताच्या स्पॅडेक्स मोहिमेंतर्गत पीएसएलव्ही सी ६० रॉकेटद्वारे दोन उपग्रहांचे प्रक्षेपण होणार आहे. या दोन उपग्रहांचे मिळून एकूण वजन सुमारे २२० किलो आहे. यापैकी एक चेझर आणि एक लक्ष्य असेल. अंतराळात डॉकिंग – अनडॉकिंग जानेवारी २०२५ मध्ये केले जाईल. हा प्रयोग पृथ्वीपासून ४७० किमी अंतरावर होईल. प्रयोगानंतर दोन्ही उपग्रह पृथ्वीभोवती दोन वर्षे फिरतील. उपग्रह चेझरमध्ये कॅमेरा आहे तर उपग्रह लक्ष्यात दोन पेलोड आहेत. प्रयोग यशस्वी झाल्यास इस्रोला कक्षेतून बाहेर पडल्यानंतर वेगळ्या दिशेने जाणारा भाग पुन्हा कक्षेत आणण्याचे तंत्रज्ञान मिळेल. कक्षेत सव्हिसिंग आणि इंधन भरण्याचा पर्यायही खुला होणार आहे. स्पॅडेक्स मिशनमध्ये दोन भिन्न अंतराळयाने अंतराळात एकमेकांशी जोडली जातील. सोप्या भाषेत सांगायचे तर दोन्ही उपग्रह अंतराळात या तंत्रज्ञानाद्वारे एकमेकांशी जोडले जातील. याला डॉकिंग म्हणतात. त्यानंतर, दोन्ही उपग्रह अंतराळात वेगळे होतील. याला अनडॉकिंग म्हणतात. इस्रोने ही मोहीम यशस्वी केल्यास तसे करणारा भारत हा अमेरिका, रशिया आणि चीन नंतर चौथ्या क्रमांकाचा देश होणार आहे. स्पॅडेक्स मोहिमेसाठी दोन्ही उपग्रह ताशी २८ हजार किमी वेगाने अंतराळात प्रवास करतील. या वेगाशी जुळवून घेऊन दोन्ही उपग्रहांना जोडणे आणि वेगळे करणे हे काम पूर्ण करावे लागेल. हे करताना कुठेही टक्कर होणार नाही याची खबरदारी घ्यावी लागेल. भारताने स्पॅडेक्स अर्थात डॉकिंग – अनडॉकिंगची क्षमता प्राप्त केली तर भविष्यात स्वतःचे अंतराळ स्थानक उभारण्याचा पर्याय भारतापुढे खुला होईल. एकाच प्रक्षेपकातून दोन वेगवेगळ्या दिशांना प्रक्षेपित केलेले यानाचे भाग अंतराळात नेऊन तिथे जोडायचे या पद्धतीने टप्प्याटप्प्याने मोठे अंतराळ स्थानक उभारणे शक्य होते. स्पेस डॉकिंगचा हा प्रयोग अर्थात स्पॅडेक्स अमलात आणून अंतराळ स्थानक उभारून त्याद्वारे अनेक महत्त्वाकांक्षी अंतराळ मोहिमा आणि प्रयोग करणे शक्य आहे. भारताला भविष्यात चंद्रावर माणूस पाठवून संशोधन करायचे आहे. मंगळ ग्रहावर यानाच्या मदतीने संशोधन करायचे आहे. या दोन्ही स्वप्नांना पूर्ण करण्यासाठी स्पॅडेक्स मोहीम यशस्वी होणे आवश्यक आहे. यामुळे भारताच्या महत्त्वाकांक्षी अंतराळ मोहिमांना चालना मिळेल. यामुळे स्पॅडेक्स मोहिमेसाठी होत असलेले प्रक्षेपण भारतासाठी महत्त्वाचे आहे. मिशनच्या यशावरच भारताचे चांद्रयान-4 मिशन अवलंबून आहे, ज्यामध्ये चंद्राच्या मातीचे नमुने पृथ्वीवर आणले जातील. चांद्रयान-4 मिशन 2028 मध्ये लाँच केले जाऊ शकते. या मोहिमेत टार्गेट आणि चेझर या दोन लहान अंतराळयानांचा समावेश आहे. हे PSLV-C60 रॉकेटमधून 470 किमी उंचीवर वेगळ्या कक्षेत सोडले जातील. तैनात केल्यानंतर, अंतराळ यानाचा वेग ताशी 28,800 किलोमीटर असेल. हा वेग व्यावसायिक विमानाच्या वेगाच्या 36 पट आणि बुलेटच्या वेगाच्या 10 पट आहे. आता लक्ष्य आणि पाठलाग करणारे अंतराळ यान दूरच्या पल्ल्याच्या भेटीचा टप्पा सुरू करतील. या टप्प्यात दोन अंतराळयानांमध्ये थेट संवाद साधता येणार नाही. त्यांना जमिनीवरून मार्गदर्शन केले जाईल. अंतराळयान जवळ येत राहील. 5KM ते 0.25KM दरम्यानचे अंतर मोजताना लेझर रेंज फाइंडर वापरेल.

### डॉकिंग तंत्रज्ञानाची आवश्यकता

व्हिज्युअल कॅमेरा 1 मीटर ते 0 मीटर अंतरावर वापरला जाईल. यशस्वी डॉकिंगनंतर, दोन अंतराळ यानांमधील विद्युत ऊर्जा हस्तांतरणाचे प्रात्यक्षिक केले जाईल. त्यानंतर स्पेसक्राफ्टचे अनडॉकिंग होईल आणि ते दोघेही आपापल्या पेलोडचे ऑपरेशन सुरू करतील. हे सुमारे दोन वर्षे मौल्यवान डेटा प्रदान करणे सुरू ठेवेल. डॉकिंग प्रयोगानंतर स्टँडअलोन मिशन टप्प्यासाठी, स्पेसक्राफ्ट ए मध्ये हाय रिझोल्यूशन कॅमेरा असतो. स्पेसक्राफ्ट B मध्ये दोन पेलोड आहेत - लघु मल्टीस्पेक्ट्रल पेलोड आणि रेडिएशन मॉनिटर हे पेलोड उच्च रिझोल्यूशन प्रतिमा, नैसर्गिक संसाधनांचे निरीक्षण, वनस्पती अभ्यास आणि ऑन-ऑर्बिट रेडिएशन पर्यावरण मोजमाप प्रदान करतील ज्यात अनेक अनुप्रयोग आहेत. चांद्रयान-4 मिशनमध्ये या तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल ज्यामध्ये चंद्रावरील नमुने पृथ्वीवर परत आणले जातील. अंतराळ स्थानक तयार करण्यासाठी आणि नंतर तेथे प्रवास करण्यासाठी डॉकिंग तंत्रज्ञानाची देखील आवश्यकता असेल.

# ‘घरांच्या खिडक्या झाकून टाका’!

## तालिबानकडून अफगाणिस्तानमधील महिलांसाठी नवा फतवा जारी

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**तालिबानच्या राजवटीमध्ये अफगाणिस्तानमधील महिलांवर बंधनं घालणं सुरूच आहे. दररोज घालण्यात येणाऱ्या नव्या आणि कडक बंधनांमुळे येथील महिलांना आयुष्य जगणं अवघड झालं आहे. आता तालिबानकडून अफगाणिस्तानमधील महिलांसाठी नवा फतवा जारी करण्यात आला आहे.**



तालिबानचा नेता हिबतुल्लाह अखुंदजादाने याबाबत आदेश दिले आहेत. नव्या फतव्यानुसार नव्यानं बांधण्यात येणाऱ्या इमारतीला अशी कोणतीही खिडकी नसावी ज्या खिडकीमधून घरातील महिला दिसतील, किंवा त्या खिडकीमध्ये येऊन महिलांना बसता येईल. असा आदेश तालिबानचा नेता अखुंदजादाने दिला आहे. दरम्यान हा आदेश फक्त नव्या इमारतींनाच लागू नसणार आहे, तर देशात ज्या जुन्या इमारती आहेत त्यांच्यासाठी देखील हा नियम लागू करण्यात आला आहे. ज्या इमारतींना अशा खिडक्या आहेत, त्या झाकून टाकण्याचे आदेश देण्यात आले आहेत. स्वंयपाक घराला खिडकी ठेवू नका, अशा खिडक्यांमधून घरातील महिला सहज बाहेरच्या लोकांना दिसू शकतात असं या आदेशात म्हटलं आहे. कुठल्याही घराला अशा खिडक्या असतील तर त्या झाकून टाकण्याची जबाबदारी ही त्या घराच्या मालकावर असणार आहे.तर दुसऱ्या एका आदेशामध्ये असं देखील म्हटलं आहे की, कुठल्याही अफगाणिस्तानी महिलेला राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय कंपन्यांनी कामाला ठेवू नये, असे केल्यास त्यांची परवानगी रद्द करण्यात येईल.महिला योग्य पद्धतीने हिजाब घालत नाही, असं येथील सरकारला वाटतं त्यामुळे आता या महिलांना काम करण्यास देखील मनाई करण्यात आली.

### असं घर आढळल्यास परवानगी रद्द !

अफगाणिस्तानच्या अर्थमंत्रालयाकडून याबाबत एक पत्रक जारी करण्यात आले आहे, त्यात असं म्हटलं आहे की सरकारच्या आदेशाचं पालन न केल्यास कंपनीचं लायन्सस रद्द करण्यात येईल.नव्या इमारती बनवताना त्या इमारतीला अशाप्रकारे खिडक्या बनवू नयेत, इमारतीच्या खिडक्या कोणत्या दिशेनं आहेत, आणि त्यातून घरातील महिला दिसतात का? हे तपासण्याची जबाबदारी तेथील नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांकडे सोपवण्यात आली आहे. जर असं एखादं घर आढळल्यास त्याची परवानगी रद्द करावी.

# विवेक अग्निहोत्री यांनी आगामी चित्रपटाची शूटिंग कशी चालली

'द दिल्ली फाइल्स'चे दिग्दर्शक विवेक अग्निहोत्री यांनी आगामी चित्रपटाची शूटिंग कशी चालली आहे याची झलक त्यांच्या चाहत्यांबरोबर शेअर केली आहे. त्यांनी सेटवरील बिहाइंड द सीन (BTS) व्हिडिओ इन्स्टाग्रामवर पोस्ट करताना त्यांच्या टीमच्या मेहनतीचे कौतुक केले. यासह प्रत्येक फ्रेम, कथा आणि तपशील आजवर न सांगितले गेलेले सत्य समोर आणेल असे सांगितले आहे. विवेक अग्निहोत्री यांनी व्हिडिओ पोस्ट करताना कॅप्शन लिहिले, "प्रत्येक फ्रेम, प्रत्येक कथा आणि तपशीलातून हिंदू नरसंहाराच्या आजवर न सांगितल्या गेलेल्या सत्याला समोर आणण्यासाठी आमची टीम दिवस-रात्र मेहनत घेत असून समर्पणाने काम करत आहे."व्हिडीओत चित्रपटाच्या सेटवरील गंभीर वातावरण पाहायला मिळते. दिग्दर्शक विवेक अग्निहोत्री प्रचंड समर्पणाने टीमबरोबर काम करताना दिसतात. चित्रपटातील अभिनेते आणि टीम आपापल्या भूमिका निभावताना आणि चित्रपटाला वास्तवात उतरवण्यासाठी मेहनत करताना




दिसतात. विवेक यांनी पुढे लिहिले, "'द दिल्ली फाइल्स' हा फक्त एक चित्रपट नसून आजवर ज्यांचा आवाज दाबला गेला त्यांना आवाज देण्याचं हे मिशन आहे."'द दिल्ली फाइल्स'चे दिग्दर्शक विवेक अग्निहोत्री असून अभिषेक अग्रवाल आणि पल्लवी जोशी या चित्रपटाचे निर्माते आहेत. हा चित्रपट तेज नारायण अग्रवाल आणि 'आय एम बुद्धा प्रॉडक्शन्स'च्या बॅनरखाली सादर केला जाईल. हा चित्रपट १५ ऑगस्ट २०२५ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येईल.द दिल्ली फाइल्स'चे दिग्दर्शक विवेक अग्निहोत्री यांनी आगामी चित्रपटाची शूटिंग कशी चालली आहे याची झलक त्यांच्या चाहत्यांबरोबर शेअर केली आहे.

## आमिर खान यांना भेटण्याचा अनुभव

'प्रतिघात' या १९८७ साली प्रदर्शित झालेल्या चित्रपटात नाना पाटेकर(NANA PATEKAR)यांच्याबरोबर प्रमुख भूमिकेत काम करत सुजाता मेहता(SUJATA MEHTA) यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्यानंतर सुजाता मेहता कंवरलाल, यतीम या १९८८ साली चित्रपटात मुख्य भूमिकेत दिसल्या. इतरही अनेक चित्रपटात त्यांनी काम केले. सुजाता मेहता यांनी वेगळ्या धाटणीच्या भूमिका साकारल्या. याबरोबरच अनेक अभिनेत्यांसह कामही केले. जितेंद्र, सनी देओल, मिथून चक्रवर्ती, रजनीकांत अशा अनेक दिग्गज अभिनेत्यांबरोबर त्यांनी स्क्रीन शेअर केली. आता एका नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत त्यांनी शाहरूख खान व आमिर खान यांना भेटण्याचा अनुभव कसा होता, यावर वक्तव्य केले आहे.हिंद रशला दिलेल्या एका मुलाखतीत सुजाता मेहता यांनी म्हटले, "चित्कार या नाटकात मी काम करत होते. त्यावेळी तो बॅकस्टेजला काम करत असे. मी जेव्हा शोमध्ये काम करत होते, त्यावेळी आमिर खानचे ट्रेनिंग चालले होते. आमिर खानने बॅकस्टेजला लोकांना पाणी दिले आहे. त्याने खडतर मेहनत घेत प्रशिक्षण घेतले व तो टॉप अभिनेत्यांपैकी एक झाला. इतक्या वर्षांनंतर इतके यश मिळाल्यानंतरही तो कुठून आला आहे, हे तो विसरला नाही.

## बिपाशासह भयंकर अनुभव




लोकप्रिय गायक मिका सिंग(MIKA SINGH) हा त्याच्या गाण्यांसाठी ओळखला जातो. आता मात्र मिका सिंग त्याच्या वक्तव्यामुळे चर्चेत आला आहे. २०२० मध्ये एका वेब सीरिजच्या माध्यमातून त्याने निर्मिती क्षेत्रात पाऊल टाकले होते. 'डेंजरस' असे या वेब सीरिजचे नाव असून, त्यामध्ये बिपाशा बासू व तिचा पती करण सिंग ग्रोव्हर प्रमुख भूमिकांत होते. आता मिका सिंगने या कलाकार जोडप्याबरोबर काम करण्याचा अनुभव भयानक होता, असे वक्तव्य केले आहे.मिका सिंगने नुकतीच कडक या यूट्यूब चॅनेलला मुलाखत दिली. या मुलाखतीत त्याने या प्रोजेक्टबद्दल बोलताना म्हटले, "मला करण सिंग ग्रोव्हर व एका नवीन मुलीला यामध्ये कास्ट करायचे होते; जेणेकरून माझ्या बजेटमध्ये हा प्रोजेक्ट पूर्ण होईल आणि आम्ही काहीतरी चांगले निर्माण करू शकू. पण, अचानक यामध्ये बिपाशा बासू आली आणि त्यांनी म्हटले की, या सीरिजमध्ये आम्ही दोघेही काम करू. त्यांनी बजेट वाढवले नाही; मात्र त्यांच्याबरोबर काम करण्याचा अनुभव भयंकर होता."मिका सिंगने सांगितले की, बिपाशा बासू व करण सिंग ग्रोव्हर यांनी अशा अनेक गोष्टी केल्या, ज्यामुळे तीन महिन्यांचे शूटिंग सहा महिन्यांपर्यंत पुढे वाढले आणि त्यामुळे माझे पैसे वाया गेले. मिका सिंगने म्हटले, "मी एक महिन्यासाठी ५० जणांची टीम लंडनला घेऊन गेलो. ते शूटिंग दोन महिन्यांपर्यंत वाढले. करण व बिपाशाने खूप नाटक केले. ते लग्न झालेले जोडपे असल्यामुळे मी त्यांच्यासाठी एक रूम बुक केली; पण त्यांनी वेगवेगळ्या खोल्या मागितल्या. मला त्यामागचे लॉजिक समजले नाही. त्यांनी दुसऱ्या हॉटेलमध्ये राहण्याची मागणी केली. आम्ही तेसुद्धा केले."याबद्दल अधिक बोलताना मिका सिंगने म्हटले, "आम्ही जेव्हा स्टंट सीन शूट कररत होतो, त्यावेळी करणचा पाय फ्रॅक्चर झाला. चित्रपटाचे डबिंग करतानासुद्धा त्यांनी खूप अडचणी तयार केल्या. घसा खवखवत असल्यासारख्या सबबी त्यांनी सांगितल्या.

## आमच्या पिढीतले कलाकार मेहनती

बॉलीवूडमध्ये बेबो म्हणून लोकप्रिय असणाऱ्या करिनाची गोष्टच वेगळी आहे. तिनं अभिनयानं एक वेगळे स्थान प्रेक्षकांच्या मनात निर्माण केले आहे. करिनानं आता ओटीटीवर डेब्यू केलं असून त्याची चर्चा होत आहे. याशिवाय तिनं नवी पिढी आणि जुनी पिढीतील कलाकार यांच्याविषयी केलेलं वक्तव्य लक्ष वेधून घेताना दिसत आहे. करिनानं त्या मुलाखतीमध्ये तब्बू आणि राणी मुखर्जी यांचे कौतुक केले आहे. या दोन्ही अभिनेत्रींनी आपल्या अभिनयानं प्रेक्षकांना जिंकून घेतले आहे. इंडियन फिल्म इंडस्ट्रीमधील सर्वात प्रतिभाशाली अभिनेत्री म्हणून राणी आणि तब्बूकडे पाहिले जाते. असेही तिनं म्हटलं. तर नव्या कलाकारांच्या तुलनेत जुन्या कलाकार हे अधिक मेहनती असल्याची प्रतिक्रिया तिनं यावेळी दिली. तब्बूविषयी बोलताना करिना म्हणाली की, तब्बू ही भारतीय फिल्म इंडस्ट्रीमधील सर्वाधिक लोकप्रिय अभिनेत्री आहे. तिच्या वयाविषयी कुणीही कधीही प्रश्न विचारत नाही. ती केवळ प्रेक्षकांचे मनोरंजन कसे करता येईल याचा विचार करत असते. शेवटी आमची बांधिलकी ही प्रेक्षकांचे मनोरंजन कसे करता येईल याच्याशी असते. तिथं तुमचे वय महत्वाचे नाही तर भूमिका जास्त महत्वाची ठरते. यावेळी करिनानं सध्याच्या पिढीतील नव्या दमाच्या कलाकारांविषयी मोठी प्रतिक्रिया दिली आहे. त्यामुळे ती चर्चेत आली आहे. करिना म्हणते, मी आता जे काही बोलणार आहे.



## हृतिकची एक्स वाईफ बॉयफ्रेंडसोबत वेकेशनला

बॉलिवूडमधील प्रसिद्ध अभिनेता हृतिक रोशनची एक्स वाईफ सुझान खान ही अनेकदा तिचा बॉयफ्रेंड अरसलान गोनीसोबत स्पॉट होते. नवीन वर्षाच्या सेलिब्रेशनसाठी आणि वेकेशन एन्जॉय करण्यासाठी सुझान आणि अरसलान हे मुंबईच्याबाहेर जाण्यासाठी शनिवारी सकाळी मुंबई विमानतळावर पोहोचले. पण यादरम्यान असे काही घडले की, सुझान आणि अरसलान यांना परत घरी परतावे लागले. नवीन वर्षाच्या स्वागतासाठी आणि वेकेशन एन्जॉय करण्यासाठी सुझान आणि अरसलान हे मुंबईबाहेर जाण्यासाठी शनिवारी सकाळी विमानतळावर पोहोचले. त्यांचे एअरपोर्टवरील अनेक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या एका व्हिडीओमध्ये सुझान खान आणि अरसलान गोनी हे एअरपोर्टच्या गेटवर कागदपत्रे दाखवताना दिसले. सुझानकडे तिची सर्व कागदपत्रे आहेत पण अरसलान कदाचित त्याचा पासपोर्ट घरी विसरला आहे. त्यामुळे अरसलानकडे पासपोर्ट नसल्याने दोघेही माघारी परतले. सुझान आणि अरसलान यांचे मुंबई विमानतळावरील व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. सुझान आणि अरसलान यांच्या सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या विमानतळावरील व्हिडीओला कमेंट करुन अनेकांनी त्यांना ट्रोल केलं.

# जैस्वाल कॉन्स्टास यांच्यात वादावादी!

## बॅटने दिलेलं उत्तर कॉन्स्टास कधीच विसरणार नाही

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात झालेल्या चौथ्या कसोटी सामन्यात टीम इंडियाला १८४ धावांनी मोठा पराभव पत्करावा लागला. भारतीय संघ या कसोटीत बॅकफूटवर असला तरी त्यांनी चांगलं पुनरागमन केलं होतं. पण ऑस्ट्रेलियाच्या गोलंदाजी माऱ्यापुढे टीम इंडियाचे फलंदाज कमी पडले. भारतावरील या विजयासह ऑस्ट्रेलियाने मालिकेत २-१ अशी आघाडी घेतली आहे. मेलबर्न कसोटी यशस्वी जैस्वालसाठी फारच दुर्दैवी ठरली, वादग्रस्तपणे बाद झाल्याने यशस्वीचे या सामन्यात शतक हुकलं. पण तत्पूर्वी यशस्वी आणि कॉन्स्टसमध्ये मैदानात भांडण झालं होतं; ज्याचा व्हीडिओ व्हायरल होत आहे.**



मेलबर्न कसोटीत पहिल्या डावात यशस्वी जैस्वाल ८२ धावा करून बाद झाला तर दुसऱ्या डावात ८४ धावा करत बाद झाला आणि अशारितीने त्याला दोन्ही डावात आपले शतक पूर्ण करता आले नाही. पण या सामन्यादरम्यान एक वेळ अशी आली की पंत आणि जैस्वाल यांच्यातील भागीदारी पाहता टीम इंडिया हा सामना जिंकू शकेल असे वाटत होते. तेव्हा ऑस्ट्रेलिया पूर्णपणे निराश झाली होती आणि नेमकं त्याचदम्यान जैस्वाल आणि कॉन्स्टास यांच्यात भांडण झाली.मैदानातच जैस्वाल आणि कॉन्स्टास यांच्यात जोरदार वादावादी झाली. यानंतर जैस्वालने आपल्या बॅटने कॉन्स्टासला प्रत्युत्तर दिले. नकळत कॉन्स्टासला जैस्वालकडून असं काही प्रत्युत्तर मिळालं जे कॉन्स्टास कधीच विसरू शकणार नाही. पण या दोघांमध्ये नेमका वाद कशावरून झाला? यशस्वी जैस्वाल फलंदाजी करत असताना त्याच्याजवळ फिल्डिंग करत असलेला सॅम कॉन्स्टस सातत्याने काही ना काही बोलून यशस्वी जैस्वालला त्रास देण्यास सुरुवात केली. सुरुवातीला भारतीय फलंदाजाने त्याकडे दुर्लक्ष केले, मात्र त्यानंतर वैतागलेल्या यशस्वी जैस्वालने कॉन्स्टासला जोरदार फटकारले. सर्वात आधी तर जैस्वाल कॉन्स्टसवर ओरडला आणि त्याला म्हणाला आपलं काम कर. यानंतर तो एलेक्स कॅरीला म्हणतो हा का माझ्याशी बोलतोय? त्यानंतर ऋषभ पंतला यशस्वी तेच सांगतो.पुढच्या चेंडूवर यशस्वी जैस्वालने एक दणदणीत फटका खेळला जो चांगलाच सॅम कॉन्स्टासला लागला. जैस्वालचा तो फटका इतका वेगवान होता की स्लो मोशनमध्ये त्याचा अंदाज आला. वेगाने आलेला हा चेंडू थेट कॉन्स्टासच्या पाठीवर लागली. त्याने चेंडू लागल्यावर लगेच काही प्रतिक्रिया नाही दिली पण चेंडू चांगलाच जोरात लागला असणार याची कल्पना समालोचन करणाऱ्या इरफान पठाणनेही दिली. यशस्वी जैस्वालला यानंतर तिसऱ्या पंचांनी वादग्रस्तरित्या बाद घोषित केले. रिव्ह्यूमध्ये यशस्वीच्या बॅट आणि ग्लोव्हज जवळून चेंडू गेला तेव्हा स्निको मीटरवर कोणतीही हालचाल झाली नाही. यानंतरही तिसऱ्या पंचाने मैदानावरील पंचाचा निर्णय बदलून यशस्वीला बाद असल्याचे घोषित करण्यात आले आहे. बीसीसीआयचे उपाध्यक्ष राजीव शुक्ला यांनीही या मुद्द्यावर प्रतिक्रिया दिली आहे. यशस्वी जैस्वाल बाद नसल्याचे त्यांनी म्हटले आहे.मेलबर्न कसोटीत पहिल्या डावात यशस्वी जैस्वाल ८२ धावा करून बाद झाला तर दुसऱ्या डावात ८४ धावा करत बाद झाला आणि अशारितीने त्याला दोन्ही डावात आपले शतक पूर्ण करता आले नाही. पण या सामन्यादरम्यान एक वेळ अशी आली की पंत आणि जैस्वाल यांच्यातील भागीदारी पाहता टीम इंडिया हा सामना जिंकू शकेल असे वाटत होते. तेव्हा ऑस्ट्रेलिया पूर्णपणे निराश झाली होती आणि नेमकं त्याचदम्यान जैस्वाल आणि कॉन्स्टास यांच्यात भांडण झाली.मैदानातच जैस्वाल आणि कॉन्स्टास यांच्यात जोरदार वादावादी झाली. यानंतर जैस्वालने आपल्या बॅटने कॉन्स्टासला प्रत्युत्तर दिले.

### नेमका वाद कशावरून झाला?


नकळत कॉन्स्टासला जैस्वालकडून असं काही प्रत्युत्तर मिळालं जे कॉन्स्टास कधीच विसरू शकणार नाही. पण या दोघांमध्ये नेमका वाद कशावरून झाला? यशस्वी जैस्वाल फलंदाजी करत असताना त्याच्याजवळ फिल्डिंग करत असलेला सॅम कॉन्स्टस सातत्याने काही ना काही बोलून यशस्वी जैस्वालला त्रास देण्यास सुरुवात केली. सुरुवातीला भारतीय फलंदाजाने त्याकडे दुर्लक्ष केले, मात्र त्यानंतर वैतागलेल्या यशस्वी जैस्वालने कॉन्स्टासला जोरदार फटकारले. सर्वात आधी तर जैस्वाल कॉन्स्टसवर ओरडला आणि त्याला म्हणाला आपलं काम कर. यानंतर तो एलेक्स कॅरीला म्हणतो हा का माझ्याशी बोलतोय? त्यानंतर ऋषभ पंतला यशस्वी तेच सांगतो.पुढच्या चेंडूवर यशस्वी जैस्वालने एक दणदणीत फटका खेळला जो चांगलाच सॅम कॉन्स्टासला लागला. जैस्वालचा तो फटका इतका वेगवान होता की स्लो मोशनमध्ये त्याचा अंदाज आला. वेगाने आलेला हा चेंडू थेट कॉन्स्टासच्या पाठीवर लागली.

# आधी सिक्सर मारला, मग क्रिझवर कोसळला

## 32 वर्षीय खेळाडूचा हृदयविकाराच्या झटक्याने दुर्दैवी मृत्यू

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**क्रिकेट खेळताना किंवा व्यायाम करत असताना तरुणांमध्ये हृदयविकाराचा झटका येण्याचे प्रमाण वाढू लागले आहे. अनेकदा अशाप्रकारच्या घटना समोर आलेल्या आहेत. आताही जालना जिल्ह्यात असाच एक धक्कादायक प्रकार घडला असून या घटनेचा व्हिडीओ सध्या व्हायरल होत आहे. जालना शहरात आयोजित क्रिकेट स्पर्धेत एका फलंदाजाचा खेळत असताना क्रिझवरच हृदयविकाराच्या धक्क्याने मृत्यू झाला आहे.**




३२ वर्षीय खेळाडू जागीच कोसळल्याचे सदर व्हिडीओमध्ये दिसत असून तरुणांच्या आरोग्याबाबतचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.हाती आलेल्या माहितीनुसार, जालना शहरातील फ्रेजर बॉईजच्या मैदानावर ख्रिसमस क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विजय पटेल बॅटिंग करत होता. त्याने सिक्सर मारल्यानंतर मधल्या वेळात तो सहकारी फलदांज अजय कसबेशी बातचीत करत होता. तेवढ्यात तो जमिनीवर कोसळला. यावेळी त्याला पाहण्यासाठी इतर खेळाडूंनी धाव घेतल्याचे दिसून येते.विजय पटेलचा सहकारी खेळाडू अजय कसबेने एबीपी माझाशी बोलताना सांगितले की, आम्ही दोघे बॅटिंग करत होतो. पटेलने सिक्सर मारल्यानंतर मी क्रिझवर चालत जाऊन त्याचे अभिनंदन केले. त्यानंतर तो पुन्हा एकदा बॅटिंगसाठी वळला आणि मी नॉन स्ट्राईक एंडकडे गेलो. पण तेवढ्यात मला पंचाने सांगितले की, तुझा सहकारी मैदानावर पडला आहे.

### हृदयविकाराच्या धक्क्याने मृत्यू

आम्ही त्याला रुग्णालयात दाखल केले, तेव्हा त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. जागतिक आरोग्य संघटनेने दिलेल्या अहवालात असे नमूद करण्यात आले आहे की, हृदयविकाराचा झटका आलेल्या पाचपैकी एक रुग्ण ४० वर्षांपेक्षा कमी वयाचा असल्याची नोंद आहे. वाढता तणाव आणि बदलत्या जीवनशैली या बाबींना जरी कारणीभूत ठरवले गेले असले तरी अनेकांना अपचनासारख्या इतरही काही समस्यांकडे दुर्लक्ष केल्यामुळे हृदयविकाराचा झटका येत असल्याचे सांगितले जाते.